# विक्रोळीतील राऊत बंधूंची दादागिरी संपवणार : सुवर्णा करंजे

**मुंबई, दि. १३ : प्रतिनिधी**

**''आमदार म्हणून सुनील राऊत यांनी कामे केली नाहीत, हा मुद्दा घेऊन आम्ही लोकांसमोर जाणार आहोत. ज्यावेळी या मतदारसंघाचे मतदार बदल घडवतील आणि आमदार म्हणून मला विधानसभेत पाठवतील, त्याच वेळेला भोंगा, दादागिरी संपणार आहे,'' असा घणाघात विक्रोळी विधानसभा मतदारसंघाच्या शिवसेनेच्या उमेदवार सुवर्णा करंजे यांनी केला. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दै. 'मुंबई तरुण भारत'ने त्यांच्याशी साधलेला संवाद...**



**■ प्रचाराला काही दिवस राहिले आहेत. त्यामुळे तुम्ही कोणते मुद्दे घेऊन प्रचार करणार आहात?**

मी मागच्या सात वर्षांत केलेली विकासकामे आणि आमदार म्हणून सुनील राऊत यांनी कामे केलेली नाहीत, हा मुद्दा घेऊन आम्ही विधानसभेला समोरे जात आहोत. लोकांचा आम्हाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. तसेच, बऱ्याच लोकांना त्रास दिला असून बदल घडविणार असल्याचे लोक सांगत आहेत. विशेषतः 'लाडकी बहीण योजने'ला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

**■ विक्रोळी मतदारसंघाचा मोठा विकास केल्याचा दावा सुनील राऊत करतात, तुमच्या मते विक्रोळीचा विकास किती केला?**

त्यांनी एक तरी चांगले विधायक काम दाखवल्यास मी स्वतः निवडणुकीच्या मैदानातून बाहेर पडेन. मी सीबीएसई शाळा सुरू केली. सिमेंट काँक्रीटचे ३५ रस्ते केले. महामार्गाला जोडणारे रस्ते केले. भूमिगत कचराकुंडी केली. १२७ कोटींचे रुग्णालय बांधण्यात येत असून त्याचे भूमिपूजन झाले आहे. ४०० गाड्यांच्या पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यांनी एक तरी काम केले का? लादी–गटारे ही आमदाराची कामे आहेत का? सीआरझेड, 'म्हाडा'चा प्रश्न सोडवला नाही. मागासवर्गीयांचा प्रश्न आहे. समाज कल्याण केंद्राची वास्तू जीर्ण झाली आहे. या समस्या सुटलेल्या नाहीत.

**■ विक्रोळीसाठी आपले व्हिजन काय असणार आहे?**

मागील दहा वर्षांत जी कामे झाली नाहीत, त्या कामांना प्राधान्य देणार आहे. कांजुर, भांडूपमध्ये मिठागरांच्या जागेचा प्रश्न आहे. डम्पिंग ग्राऊंड हटविण्यासाठी प्रयत्न करणार, तसेच दुर्गंधी कमी करण्याचा प्रयत्न करणार. आमदारांनी विधानभवनात हे प्रश्न मांडले नाहीत. त्यामुळे विकास रखडला. मी प्रभाग ११७ मध्ये केलेल्या कामांचे नागरिक साक्षीदार आहेत. तसेच, मी कामे करणार आहे. ती वचननाम्यात मांडत आहे.

**■ सुनील राऊत यांनी 'बकरी हलाल होगी' अशी टिप्पणी केली. याला शिवसेनेकडून अपेक्षित विरोध झाला नाही. याचे कारण काय?**

महिलावर्ग त्यांच्या स्वभावामुळे नाराज आहे. ज्येष्ठांचाही एकेरी उल्लेख केला जातो. अशी भाषा लोकप्रतिनिधीला शोभत नाही.

**■ वाढत्या महागाईच्या प्रश्नाकडे आपण कसे पाहाता?**

महागाई वाढली असे म्हणत असलो, तरी लोकांचे आर्थिक उत्पन्न वाढले आहे. एकेकाळी ३०० रुपये पगार घेणारे आता जवळपास ६० हजार पगार घेत आहेत. त्यामुळे 'लाडकी बहीण योजने'त १ हजार, ५०० रुपयांवरून २ हजार, १०० रुपये दिले जाणार आहेत. नागरिकांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर विश्वास आहे. ते योग्य निर्णय घेतील आणि निवडणुकीनंतर पैसे खात्यात जमा होतील.

**■ सकाळचा भोंगा बंद झालेला दिसेल का?**

या विभागातील मतदार मला विधानसभेत पाठवतील, त्याच दिवशी सकाळचा भोंगा बंद, दादागिरी संपणार आहे.

**■ सुनील राऊत यांनी त्रास दिल्याने तुम्ही उबाठा गट सोडला. काय सांगाल त्याबाबत?**

मला कोणत्याही कार्यक्रमाला बोलावले जात नव्हते. २०१७ सालच्या निवडणुकीत विरोध असणाऱ्यांना पक्षात घेताना मला डावलले. माझ्या कामांत खो घातला. नगरसेवक हा विरोधी पक्षाचा असल्यासारखे माझ्याशी वागणे होते. रस्त्याच्या कामाबाबत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असता, आमदारांनी कोणतीही मदत केली नाही. उलट त्यांनीच ते करायला लावले. विरोध करण्याचे अनेकदा काम केले. मानसिक खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला. रिक्षा युनियनबाबत अगोदरचे नेते काहीही करत नसल्याने ते माझ्याकडे आले. त्यांनी अध्यक्ष होण्याचे सांगितले. त्यामुळे रिक्षा युनियनचे अध्यक्ष झाले. मात्र, आमदारांनी ते मानले नाही. २०२२ नंतर महापालिकेची कामे केल्यानंतरही मला डावलले. अनेकदा बोलू दिले नाही.

**■ लोकसभेला विक्रोळीतून पिछाडी मिळाली. विधानसभेला ती कशी भरून काढणार?**

निश्चितच प्रयत्न करू. लोकसभेला सुनील राऊत यांच्या मतदारसंघात त्यांचे मताधिक्य कमी झाले. विधानसभेला त्यांचे डिपॉझिट वाचेल का, हा प्रश्न आहे. कारण, मला चांगला प्रतिसाद मिळत आहे. लोकांना त्यांनी त्रास दिला आहे. ते माझ्याशी जोडले आहेत.

**■ मतदारांना काय आवाहन करणार?**

विकास करणाऱ्याच्या पाठीशी मतदारांनी उभे राहावे. आज विक्रोळी भकास केली. कांजुरमध्ये माझा प्रभाग मी नीट ठेवला आहे. त्यात एकही यांचे काम नाही. विक्रोळीत कन्नमवारनगर, टागोरनगर, सूर्यनगर, पवई येथे एकही काम केले नाही. त्यामुळे विजयी झाल्यानंतर विकास करून दाखवणार. कारण, मला काम करण्याची पद्धत माहीत आहे. विक्रोळीच्या समस्या विधानसभेत मांडेन.

सविस्तर मुलाखत पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा
महा MTB www.mahamtb.com

# नसीम खानच्या प्रचारातून धर्मांधतेचे प्रकटीकरण!

## गणरायाच्या प्रतिमेवर लावले स्वतःचे स्टीकर

**मुंबई, दि. १३ : विशेष प्रतिनिधी**



राज्यात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहत असून उमेदवारांच्या प्रचारालाही चांगलाच जोर धरलेला दिसत आहे. अशातच काँग्रेस आ. नसीम खान यांच्या प्रचारातून हिंदूंच्या भावनांना ठेच पोहोचवण्याचा प्रकार चांदिवली मतदारसंघात घडला आहे. डोंगरे सदन चाळ, मोहिली व्हिलेज, साकीनाका येथील ही घटना आहे. घरावर असलेल्या गणपती बाप्पाच्या प्रतिमेवर प्रचाराचे स्टिकर लावत काँग्रेसने आपल्या धर्मांधतेचे पुन्हा एकदा प्रकटीकरण यातून केले आहे. हे प्रकरण बुधवार, दि. १३ नोव्हेंबर रोजी व्हायरल झालेल्या एका व्हिडिओद्वारे उघडकीस आले. 'मेरा काम ही, मेरी पहचान है', 'व्होट फॉर मोहम्मद आरिफ नसीम खान', 'हात बदलेगा हालाथ' अशा प्रकारचे आशय असलेले स्टिकर नसीम खान यांच्या प्रचारार्थ चांदिवली मतदारसंघात दारोदारी लावले जात आहेत. त्यांच्या कार्यकर्त्यांनी येथील एका घरावर असलेल्या गणपती बाप्पाच्या प्रतिमेवर स्टिकर लावत हिंदूंच्या भावना दुखावण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांमध्ये काँग्रेसविरोधात संतापाची लाट उसळल्याचे पाहायला मिळत आहे.

# 'अभिजात फिल्म सोयायटी'तर्फे 'अभिजात शॉर्ट फिल्म फेस्टिवल'चे आयोजन

**मुंबई :** 'अभिजात फिल्म सोयायटी'तर्फे 'अभिजात शॉर्ट फिल्म फेस्टिवल'चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवासाठी प्रवेशिका मागविण्यास सुरूवात झाली आहे. लघुपट, माहितीपट, ॲनिमेशनपट आणि गाण्याचा व्हिडिओ इत्यादी कलाकृती या महोत्सवासाठी पाठविता येणार आहेत. प्रथम विजेत्या लघुपटाला २१ हजार, द्वितीय विजेत्या लघुपटाला १५ हजार, तृतीय विजेत्या लघुपटाला ११ हजार अशी १७ विभागांमध्ये मिळून एकूण एक लाखापर्यंतची पारितोषिके या महोत्सवांमध्ये विजेत्या कलाकृतींना मिळणार आहेत. या महोत्सवासाठी प्रवेशिका पाठविण्याची अंतिम तारीख दि. २५ नोव्हेंबर आहे. या महोत्सवासाठी प्रवेशिका पाठविण्याकरता www.abhijaatfilms.org या संकेतस्थळावर संपर्क साधावा.

# विलेपार्लेमध्ये उद्या वारसा सहलीचे आयोजन

**मुंबई :** 'बृहन्मुंबई महानगरपालिका' आणि 'शिलाहार हेरिटेज सर्विसेस' यांच्या संयुक्त विद्यमाने विलेपार्ले वासरा सहलीचे (विलेपार्ले हेरिटेज वॉक) आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता विलेपार्ले येथील दिनानाथ मंगेशकर नाट्यगृह येथून ही सहल सुरू होणार आहे. लेखक आणि पुरातत्वशास्त्रज्ञ संदीप दहिसरकर या सहलीत लोकांना मार्गदर्शन करणार आहेत. ही सहल सर्वांसाठी विनामूल्य आहे. अधिक माहितीसाठी आणि नावनोंदणी करण्यासाठी भुपेश राणे ८४३३६३६५७६, विशाल कोकाटे ९५९४०९०३३३ आणि निखिल कोलेकर ९९८७५७२३५३ यांच्याशी संपर्क साधावा.

# 'ब्राह्मण सेवा संघ'तर्फे विशेष व्याख्यान

**मुंबई :** 'ब्राह्मण सेवा संघ' बोरिवलीतर्फे सुप्रसिद्ध व्याख्यात्या डॉ.धनश्री लेले यांचे 'हिंदू धर्म म्हणजे नेमके काय' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४.३० वाजता श्री स्वामी नारायण मंदिर सभागृह, अजमेरा ग्लोबल शाळेसमोर, योगीनगर, लिंक रोड, बोरिवली पश्चिम, मुंबई ४०००९१ येथे हा कार्यक्रम होणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून अधिकाधिक लोकांनी या कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

**FORMAT C-2**

*(For political party to publish in website, newspapers, TV)*

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

*(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)*

Name of Political Party : **Bharatiya Janata Party**
Name of Election : **Maharashtra Legislative Assembly - 2024**
Name of State/UT : **Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Name of constituency | Name of candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 139 - Murbad | KISAN SHANKAR KATHORE | Name of Court, Case No. & Status of Case(s) | Section of Acts the concerned & brief description of offence (s) | Name of Court & date (s) of Order (s) | Description of Offence(s) & punishment imposed | Maximum Punisment Imposed |
| 1 | | | Hon'ble Joint Civil judge & 1st class Judicial Magistrate, Ulhasnagar. CC No. 796/2017 Pending | U/s. 420, 408, 467, 468, 471, 12B of IPC. | Nil | Nil | Nil |

Name of constituency : **139 - Murbad**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation................
**Chandrashekhar Bawankule**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**FORMAT C-1**

*(For candidate to publish in newspaper, TV)*

**Declaration about criminal cases**

*(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)*

Name and address of candidate : **SHRI KALIDAS NEELKANTH KOLAMBKAR**
5/36, Spring Mill Chawl, J. D. Ambekar Marg, Naigaon, Dadar, Mumbai - 400014

Name of Political Party : **Bharatiya Janata Party**
*(Independent candidates should write "Independent" here)*

Name of Election : **Maharashtra Legislative Assembly - 2024**
Name of constituency : **180 - WADALA**

I **SHRI KALIDAS NEELKANTH KOLAMBKAR**, a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

**(A) Pending Criminal Cases**

| Sl. No. | Name of Court | Case No. and Dated | Status of Case(s) | Section(s) of Acts concerned & brief description of offence (s) |
|---|---|---|---|---|
| 1 | Court, Mazgaon | Nil | Pending | Section 143,145,147,149, 188,269, 37(3), 135 of Cr-P.C |
| 2 | Addl. Chief Metropolitan Magistrate Court | Nil | Pending | Section 37 (3), 135, of Mumbai Police Act,1951 |
| 3 | Pending in Court | Nil | Pending | Section 37 (1) (e) (3) 135 of Mumbai Police Act,1951 |
| 4 | Pending in Court | Nil | Pending | Section 188, 169, 170, under IPC Section 51 (b), 37 (1) of Disaster Management Act |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sl. No. | Name of Court & Date (s) of Order (s) | Description of Offence (s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
|---|---|---|---|
| NA | NA | NA | NA |

Name & Signature of Candidate
**SHRI KALIDAS NEELKANTH KOLAMBKAR**

**This may be published in Newspapers and TV from the day following the last date for withdrawal of candidature and upto two days before the date of poll**

**Format CI-**
**(for candidate to publish in Newspapers, Tv')**

**Declaration about criminal cases**

(As per the judgment dated 25th September, 2018, of lion'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India &Anr.)

**Name and address of candidate:** Mangal Prabhat Lodha, resident of 12 Anupam, 11 Manav Mandir Road, Mumbai 400 006
**Name of political party: Bharatiya Janata Party (Independent candidates should write "Independent" here)**
**Name of Election:** Maharashtra Legislative Assembly - 2024
***Name of Constituency: 185 Malabar Hill Assembly Constituency**

**I, MangalPrabhat Lodha, a candidate for the Maharashtra Legislative Assembly - 2024 abovementioned election, declare for public information the following details about my criminal antecedents**

**(A)Pending criminal cases**

| Sl No | Name of Court | Case No.and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1 | Metropolitan Magistrate, 40th Court at Girgaum Court. | Case No.440/PS/2024<br>Next Date: 18.11.2024 | For statement under Sec.313 of CRPC | Section 174 (a) and 147 of Railways Act, 1989.<br>Alleged Political Demonstration, by stopping running of train |
| 2 | Bombay City Civil and Sessions Court, 54th Court at Mumbai | Sessions Case No.256 of 2021,<br>Next Date: 10.12.2024 | For Cross Examination of PW1. | IPC 353, 332,341,143,147,149,188,269, 427, 504 a/w MPA 37,135, & PDPA 3, 4.<br>Political motivated case against BEST escalated Bills during Lockdown. |

**(B)Details about cases of conviction for criminal offences**

| Sl No | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
|---|---|---|---|
| NA | NA | NA | NA |

*In the case of election to Council of States or election to Legislative Council by MLAs, mention the election concerned in place of name of constituency